



गोव्यात बेकायदेशीर बांधकामांचा वाढता प्रश्न पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



अफगाणिस्तान- ऑस्ट्रेलिया सामना पावसामुळे रद्द पान ४ वर

वेर्णा, शनिवार, १ मार्च २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 177 | Verna, | facebook.com/dainikherald | Saturday 1 March 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### पाकमध्ये भीषण स्फोट; ३ जणांचा मृत्यू

**कराची, दि. २८ :** पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वा प्रांतात शुक्रवारी दुपारी नमाज पठणावेळी भीषण बॉम्बस्फोट झाला. या स्फोटामध्ये किमान ३ जणांचा मृत्यू झाला असून २० जण गंभीर जखमी झाले आहेत. या प्रांतातील नौशेरा भागात एका मशिदीमध्ये हा स्फोट झाला. नमाज पठणासाठी मोठ्या संख्येने लोक या मशिदीमध्ये गोळा झाले होते. त्याचवेळी हा स्फोट झाला. सुसाईड बॉम्बरकरही हा आत्मघाती स्फोट घडवून आणल्याची प्राथमिक माहिती स्थानिक पोलिसांनी दिली आहे. रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांची प्रकृती गंभीर असल्यामुळे मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बॉम्बस्फोटाची घटना घडल्यानंतर तातडीने बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली. स्थानिक पोलिस प्रशासनाने मशिदीच्या आसपासच्या भागाची नाकेबंदी केली. बचावपथकाचे प्रमुख बिलाल फैझी यांनी किमान २० नागरिक गंभीर जखमी दिला. मशिदीच्या मुख्य सभागृहात नमाज पठण चालू असताना हा बॉम्बस्फोट झाला.

----------

### तुहिन कांत पांडे सेबीचे नवे प्रमुख

**नवी दिल्ली, दि. २८ :** केंद्र सरकारने वित्त सचिव तुहिन कांत पांडे यांची सेबीचे ११ वे प्रमुख म्हणून नियुक्ती केली. पांडे ओडिशा-केडरचे भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस) अधिकारी आहेत. त्यांची तात्काळ प्रभावाने नियुक्ती करण्यात आली असून पुढील तीन वर्ष त्यांचा कार्यकाळ असेल, असे केंद्र सरकारने नियुक्तीच्या आदेशात नमूद केले आहे. सेबीच्या १० व्या प्रमुख माधबी पुरी बुच यांचा ३ वर्षांचा कार्यकाळ शुक्रवारी पूर्ण झाला आहे. त्यामुळे नव्या प्रमुखांची नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या आदेशानुसार मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने पांडे यांची सेबीच्या प्रमुखपदी नियुक्ती करण्यास मान्यता दिली आहे. १९८७ च्या बॅचचे आयएएस अधिकारी हे महसूल विभाग हाताळणारे वित्त मंत्रालयातील सर्वात वरिष्ठ अधिकारी आहेत. ७ सप्टेंबर २०२४ रोजी त्यांची वित्त सचिव म्हणून नियुक्ती झाली होती. पांडे हे गुंतवणूक आणि सार्वजनिक मालमत्ता व्यवस्थापन विभाग मध्ये सर्वाधिक काळ कार्यरत असलेले सचिव होते.

------------

### बिहारमध्ये भूकंपाचे तीव्र धक्के

**पाटणा, दि. २८ :** बिहार आणि नेपाळमध्ये अनेक ठिकाणी भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. शुक्रवारी (दि.२८) पहाटे २:३६ वाजता झालेल्या या भूकंपाची तीव्रता ५.५ होती. याशिवाय, पाकिस्तानमध्येही भू-भाग हादरला आहे. तिथे भुकंपाची तीव्रता ४.५ मोजण्यात आली. सध्या तिन्ही ठिकाणी कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्याचे वृत्त नाही. गेल्या महिन्यातही बिहारपासून नेपाळपर्यंत भूकंपाचे धक्के जाणवले होते. त्याची तीव्रता ७.१ इतकी मोजली गेली. नेपाळमधील लोबुचेपासून ८४ किमी वायव्येस १० किमी खोलीवर हा भूकंप झाला. नेपाळमध्ये भूकंप होणे सामान्य आहे. नेपाळ जगातील त्या धोकादायक क्षेत्रात आहे, ज्याला सर्वात सक्रिय टेक्टोनिक झोन म्हटले जाते. नेपाळमध्ये भूकंपाच्या घटना अनेक वेळा नोंदवल्या गेल्या आहेत. यामुळेच भूकंपासारख्या नैसर्गिक आपत्तींना हा भाग सर्वात जास्त बळी पडतो. नेपाळमध्ये परिस्थिती बिघडल्यावर वेळोवेळी अलर्ट जारी केले जातात आणि अनेक अहवालांमध्ये ते जोखीम क्षेत्र म्हणून वर्णन केले गेले आहे.

### हवामान

कमाल : २८ किमान : २३
आर्द्रता : ७५

### बाजार भाव

सोने : ₹ ८९,७८० (१० ग्रॅम)
चांदी : ₹१,००,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५ .७७ ↑ (२३१.१६ )
निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

# जेव्हा अधिकारी आमदाराला भिडतो

## आमदार आमोणकर आणि वीज अभियंता काशीनाथ शेट्ये यांच्यात खडाजंगी

■ टीम दैनिक हेराल्ड :

**वास्को, दि. २८ : बोगदा (मुरगाव) येथील वीज खात्याच्या वसाहतीतून जाणारी वाट बंद करण्यावरून मुरगावचे आमदार संकल्प आमोणकर व सध्या चर्चेत असलेले वीज खात्याचे कार्यकारी अभियंते काशिनाथ शेट्ये यांच्यामध्ये शुक्रवारी मोठा वाद निर्माण झाला. या वादाचा व्हिडिओ व्हायरल झाल्याने आमोणकर यांच्या संतापात आणखी भर पडली. या सगळ्या प्रकरणानंतर आमोणकर यांनी शेट्ये यांच्या बडतर्फीची मागणी केली आहे तर दुसरीकडे आमोणकर यांनी अडवलेले काम पोलिस बंदोबस्त घेऊन आपण दोन दिवसांत पूर्ण करणार असल्याचे शेट्ये यांनी म्हटले आहे.**



बोगदा येथे वीज खात्याची वसाहत असलेल्या परिसरात चार ते पाच ठिकाणी बेकायदेशीररीत्या वाटा तयार केल्या आहेत. या वाटा बंद करण्याचा निर्णय वीज विभागाने घेतला आहे. मात्र, याला स्थानिक आमदार संकल्प आमोणकर यांचा विरोध आहे. यातूनच शुक्रवारी वीज विभागाचे कार्यकारी अभियंता काशिनाथ शेट्ये जेसीबी घेऊन यापैकी एक वाट बंद करायला गेले असता त्या ठिकाणी आमदार संकल्प आमोणकर पोहोचले आणि त्यांनी शेट्ये यांना हे काम करू नका अशा सूचना केल्या. यातूनच हा वाद वाढत गेला. आमोणकर शेट्ये यांच्याशी वाद घालत असताना या वादाचे चित्रीकरणही करण्यात आले आणि हा व्हिडिओ व्हायरल झाला.

व्हायरल व्हिडिओत असलेल्या संभाषणानुसार काशीनाथ तुम्ही अधिकारी म्हणून वावरत नसून एखाद्या कार्यकर्त्यासारखे वागत आहात, तसे वागू नका म्हणून आमोणकर त्यांना सांगत आहेत तर त्याचवेळी तुम्ही आमदारासारखे वागत नाही आहात, असे शेट्ये त्यांना सुनावत आहेत. दरम्यान आपण दोन दिवसांत तेथे पोलिस संरक्षणात कामास प्रारंभ करणार असल्याचे अभियंते शेट्ये यांनी सांगितले.

बोगदा येथील वीज खात्याच्या वसाहतीतून ये-जा करण्यासाठी वाट आहे. ती वाट बंद करण्यासाठी शेट्ये व इतर अधिकारी, कर्मचारी तेथे जेसीबी घेऊन सकाळी आले होते. त्यांनी ती वाट बंद करण्याचा प्रयत्न केल्यावर तेथील स्थानिकांना विरोध केला. त्यानंतर त्यांनी आमदार आमोणकर यांना कळविले. आमोणकर घटनास्थळी आल्यावर त्यांनी शेट्ये यांना काम थांबविण्याची सूचना केली. तथापि, रहिवाशांसाठी चार वाटा आहेत, त्यापैकी दोन वाटा बंद करतो, असे शेट्ये यांनी सांगितले.

> वीज विभागाच्या मालमत्तेतून जाणाऱ्या बेकायदेशीर वाटा बंद करण्याचा विषय दोन वर्षांपासून सुरू आहे. एकूण चार ते पाच वाटा आहेत, त्यापैकी एक वाट बंद करण्यासाठी आमचे अधिकारी तिकडे नियमानुसारच आणि मान्यतेनुसारच गेले होते. या प्रकरणात अभियंते शेट्ये यांनी वाट बंद करण्याची घेतलेली भूमिका योग्यच आहे. केबल ऑपरेटर्सच्या बाबतीतही शेट्ये यांची भूमिका रास्तच आहे.
>
> – स्टीफन फर्नांडिस, मुख्य अभियंता

# जानेवारी २०२५ मध्ये २३ जणांचा मृत्यू

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २८ :** गोव्यात रस्ते अपघात आणि मृत्यूदर सतत वाढत असून, जानेवारी २०२५ मध्ये एकूण २११ अपघातांची नोंद झाली आहे. या अपघातांमध्ये २३ जणांनी प्राण गमावले. मागील वर्षाच्या तुलनेत अपघातांची संख्या कमी असली, तरी मृत्यूदरात किंचित वाढ झाली आहे.

नेहमीप्रमाणे फोंडा ,वेर्णा आणि मडगाव येथे प्राणघातक अपघातांची नोंद झाली. किरकोळ अपघात फोंडा, वेर्णा आणि मायना कुडतरी येथे झाले. तसेच कुंकळ्ळी हे क्षेत्र अपघातप्रवण ठिकाणी आघाडीवर आहे. मागील वर्षी जानेवारी महिन्यात २६४ अपघात झाले होते, तर यंदा ही संख्या २११ वर आली आहे. मात्र, मृत्यूच्या घटनांमध्ये फारसा बदल झालेला नाही. जानेवारी २०२४ मध्ये २४ जण मृत्युमुखी पडले होते, तर यंदा २३ जणांचा मृत्यू झाला आहे.

जानेवारी २०२५ मध्ये झालेल्या २३ प्राणघातक अपघातांपैकी:

फोंडा – ३, जुने गोवे – २, वेर्णा – ४, मडगाव – २, अंजुना – ३, डिचोली – २, पर्वरी, म्हापसा, कुळे, कळंगुट, मांद्रे, वास्को आणि मोपा येथे प्रत्येकी १ अपघात झाला. तसेच, किरकोळ अपघातांची संख्याही महत्त्वाची



आहे. फोंडामध्ये १६, जुने गोवे १५, कुंकळ्ळी १५, वेर्णा १४, पणजी १३, पर्वरी १२, कोलवाळ ११, म्हापसा, मायना – कुडतरी आणि फातोर्डा १०, मडगाव ९, अंजुना आणि डिचोली ८, कोलवा ७, कुळे आणि कुडतरी ६, कळंगुट आणि म्हार्दोळ ५, मांद्रे, काणकोण आणि वास्को ४, तर आगशी, वाळपई, सालिगाव, पेडणे आणि केपे येथे ३ आणि मोपा आणि मुरगाव येथे प्रत्येकी २ अपघातांची नोंद झाली.

निवृत्त पोलीस उपनिरीक्षक मधुकर बायकर यांनी स्पष्ट केले की, बहुतांश अपघात मद्यप्राशन करून वाहन चालवण्यामुळे घडतात. दारूच्या सेवनामुळे निर्णयक्षमता आणि प्रतिक्रिया वेळ कमी होते, ज्यामुळे टाळता येण्यासारखे अपघात घडतात.

रस्ते अपघात रोखण्यासाठी सार्वजनिक जनजागृती मोहीम राबवणे, सुरक्षित वाहन चालवण्याचे शिक्षण देणे आणि राइड-हेलिंग सेवांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळले गेले तर अपघातांची संख्या निश्चितच कमी होऊ शकते.

# बोरी पूल जमीन संपादनाविरोधात लोटलीवासीय आक्रमक

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २८ :** सार्वजनिक बांधकाम विभागाने वादग्रस्त बोरी पूल प्रकल्पासाठी सीमांकन प्रक्रिया पुढे नेण्याचा प्रयत्न केल्यास, लोटलीमधील शेतकरी त्यांच्या पूर्वजांपासून चालत आलेल्या जमिनींचे रक्षण करण्यासाठी सज्ज असल्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत. हे प्रकरण सध्या राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण समोर प्रलंबित असून, पुढील सुनावणी २३ एप्रिल रोजी होणार आहे. मात्र, या विलंबामुळे शेतकरी संतप्त असून, सरकार त्यांच्या जमिनींवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करेल, अशी त्यांना भीती आहे.

प्रस्तावित पुलासाठी पर्यावरणीय मंजुरी आवश्यक आहे का, यावर अद्याप वाद सुरू आहे. शेतकऱ्यांच्या मते, हा प्रकल्प त्यांच्या खाजन शेतजमिनींवर गंभीर परिणाम करेल, ज्या त्यांच्या उपजीविकेचा मुख्य आधार आहेत. पर्यावरणीय मुद्द्यांची योग्य दखल न घेताच सीमांकन आणि कामकाज सुरू केल्यास त्यांचे मोठे नुकसान होईल, असा त्यांचा दावा आहे. एनजीटीच्या अलीकडील स्थगितीनंतर, 'दैनिक हेराल्ड'ने लोटली शेतकऱ्यांशी संवाद साधला. अंतर्गत चर्चेनंतर, त्यांनी त्यांच्या हक्कांच्या रक्षणासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचा निर्णय घेतला आहे. लोटलीमधील कार्बोट, मस्कासाना आणि बेब्दो भाडेकरू संघटनेचे अध्यक्ष अल्बर्ट पिन्हेरो यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. पीडब्ल्यूडी जाणीवपूर्वक खाजन क्षेत्र कोरडे होण्याची वाट पाहत आहे. खारफुटींच्या नैसर्गिक व्यवस्थेमुळे हे क्षेत्र मासेमारीसाठी तसेच शेतीसाठी महत्त्वाचे आहे. मात्र, एकदा खाजन कोरडे पडले की, सीमांकन प्रक्रिया सुरू करण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. यामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडतील, असे पिन्हेरो म्हणाले. पिन्हेरो यांच्या म्हणण्यानुसार, जर पीडब्ल्यूडीने प्रक्रियेची वाट न पाहता सीमांकन करण्याचा प्रयत्न केला, तर शेतकरी

पान २ ▶

# दहावीची परीक्षा आजपासून

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २८ :** गोव्यात गोवा शालान्त मंडळाची दहावीची परीक्षा उद्यापासून म्हणजेच १ मार्चपासून (शनिवार) सुरू होत आहे. राज्यातील ३२ केंद्रे यासाठी निश्चित करण्यात आली आहे. या ३२ केंद्रांवर तब्बल १८८७१ विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत. ही परीक्षा २१ मार्च २०२५ पर्यंत चालणार आहे. उद्या (शनिवार) पहिली भाषा (इंग्रजी/मराठी/उर्दू) विषयाचा पेपर होणार आहे. दररोज सकाळी ९.३० ते १२.३० वाजेपर्यंत पेपर असणार आहे.

दररोज सकाळी ९.३० ते १२.३० वाजेपर्यंत पेपर असेल. यंदा विद्यार्थ्यांपेक्षा विद्यार्थीनींचा आकडा थोडा अधिक आहे. ९२९७ विद्यार्थी तर ९५७४ विद्यार्थीनी परीक्षा देतील. विद्यार्थ्यांनी पेपर सुरू होण्यापूर्वी अर्धा तास अगोदर म्हणजे ९ वाजता परीक्षा केंद्रावर हजर राहणे आवश्यक आहे. गेल्या वर्षी १८९१४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. गत वर्षापेक्षा यंदा विद्यार्थ्यांचा आकडा ३४ ने कमी झाला आहे. कडक बंदोबस्तात ही परीक्षा पार पडणार असल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.

# पणजीत आज व्हिवा कार्निव्हल..!

## आकर्षक विद्युत रोषणाई | वाहतुकीत बदल, अवजड वाहनांना बंदी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २८ :** राज्यात उद्या शनिवारपासून कार्निव्हलला सुरू होत आहे. हा उत्सव आज शुक्रवारपासून रोजी पर्वरीतून सुरू होणार होता. मात्र पर्वरी उड्डाणपुलाचे काम आणि एकंदरीत वाहतूक व्यवस्थेवर पडणारा ताण लक्षात घेता पर्यटन खात्याने तो रद्द करण्यात आला. यामुळे उद्या १ मार्च रोजी पणजीत किंग मोमोची राजवट असेल. कार्निव्हलमुळे उद्या वाहतुकीतही बदल करण्यात आला आहे. राजधानी कार्निव्हलमुळे सजली असून विविध ठिकाणी सुशोभीकरण – रंगरंगोटी, आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. दिवजा सर्कल सारख्या मोक्याच्या ठिकाणी अप्रतिम सजावट केली आहे.



संग्रहित छायाचित्र

सुरुवातीला चित्ररथांची रांग ही सांता मोनिका जेटीपासून सुरू केली जाणार असून, दुपारी ३.३० वाजता उद्घाटन झाल्यानंतर प्रत्यक्ष चित्ररथ मिरवणूक सुरू होईल. दुपारी २ वाजल्यापासून चित्ररथ सांतामोनिका जेटी ते जुन्या सचिवालयामार्गे ज्या ठिकाणी मिरवणुकीची सुरवात होते त्या ठिकाणी जातील. तेथून चित्ररथ मिरवणुकीचे कला अकादमी, कांपाल येथे समापन होईल आणि नंतर हे सर्व चित्ररथ येथील फुटबॉल ग्राउंडवर उभे केले जातील. केटीसी सर्कलवरून दिवजा सर्कलकडे येणाऱ्या चित्ररथांना मेरशी बायपास मार्गे रायबंदर कॉजवेच्या दिशेने वळवण्याचा प्लान आहे. वाहतूक खात्याने जारी केलेल्या गाईडलाईन्स नुसार, नो-पार्किंग झोन तयार करण्यात आले आहेत. तसेच अवजड वाहनांना बंदी आहे. पणजीत येणाऱ्या वाहनांनी पाटो ब्रिज – दिवजा सर्कल – एमएलसीपी पार्किंग मार्गे शहरात प्रवेश करावा. बांबोळीच्या बाजूने येणाऱ्या वाहनांनी मळा ब्रिज – फोर पिलर जंक्शन – भाटले मार्गे पणजीत प्रवेश करावा. फ्लोट परेड सुरू झाल्यानंतर शहरात बस वाहतूक बंद राहील. रायबंदरहून पणजीत येणारी वाहने मेरशी अंडरपास – एनएच-४ ए मार्गे पणजीत वळवली जातील. दिवजा सर्कल ते रायबंदर-मेरशी बायपास जंक्शन दरम्यानचा रस्ता सर्वसामान्य वाहतुकीसाठी बंद केला आहे.

पान २ ▶

# ब्रदीनाथ धाम येथे हिमनदी फुटल्याने ५५ मजूर बर्फाखाली

## ३२ कामगारांची सुखरूप सुटका : उर्वरितांना बाहेर काढण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू

**उत्तराखंड, दि. २८ :**

उत्तराखंडच्या चमोली जिल्ह्यातील बद्रीनाथ धामजवळ हिमनदी फुटल्याची मोठी दुर्घटना घडली असून, यात सीमा रस्ते संघटनेच्या (बीआरओ) प्रकल्पावर काम करणारे ५७ कामगार बर्फाखाली गाडले माहिती समोर आली आहे. शुक्रवारी सकाळी माणा गावाजवळ ही दुर्घटना घडली. प्रशासनाने तत्काळ मदत आणि बचावकार्य सुरू केले असून, आतापर्यंत ३२ कामगारांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले आहे. उर्वरितांना बाहेर काढण्यासाछी लष्कर युद्धपातळीवर मदत आणि बचाव कार्यात गुंतले आहे, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून देण्यात आली आहे.



चमोलीचे जिल्हा दंडाधिकारी संदीप तिवारी यांनी सांगितले होते की, माना गाव आणि माना पास दरम्यान बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनजवळ हिमस्खलनाची माहिती मिळाली होती, त्यामुळे अगोदरच अनेक एजन्सींना मदत आणि बचाव कार्यासाठी तैनात करण्यात आले होते. पण अचानक हिमनदी फुटल्याने हे कामगार गाडले गेले. लष्करासोबतच एनडीआरएफ, एसडीआरएफच्या बचाव पथकांना बचाव कार्यासाठी पाठवण्यात आले आहे. मात्र, चमोली-बद्रीनाथ महामार्ग बंद झाल्याने काही बचाव पथके वाटेत अडकली आहेत. परिस्थिती गंभीर असून सर्व संबंधित अधिकाऱ्यांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच, वीज पुरवठा आणि वाहतूक सुरळीत करण्यासाठी संबंधित यंत्रणांना कार्यरत करण्यात आले आहे.

जिल्हा दंडाधिकारी तिवारी यांनी सांगितले की, लष्कराच्या हालचालीसाठी रस्ता तयार करण्याचे काम हे मजूर करीत होते. ज्या ठिकाणी हिमस्खलन झाले, तिथं जवळच त्यांच्या राहण्यासाठी छावण्या बांधल्या आहेत, जिथे ते कंटेनरमध्ये राहतात. सकाळी अचानक हिमस्खलन झाले तेव्हा ते स्वतःला वाचवण्यासाठी इकडे तिकडे धावले असावेत. यापैकी १० जण लष्कराच्या किंवा आयटीबीपी कॅम्पच्या दिशेने धावले आणि सकाळीच सापडले. उर्वरित २२ लोक जोशीमठच्या दिशेने धावले जेथे त्यांना सुरक्षेच्या कारणास्तव एक हॉटेल सापडले आणि तिथेच थांबले. या २२ लोकांना त्या हॉटेलमधूनही बाहेर काढण्यात आले आहे. आतापर्यंत एकूण ३२ लोकांना बाहेर काढण्यात आले आहे, उर्वरित २५ लोक अजूनही बेपत्ता आहेत कारण हवामान खूपच खराब आहे. उद्या शनिवारी हवामान चांगले असल्यास हेलिकॉप्टरद्वारे बचाव कार्य केले जाईल. बचाव कार्य करण्यासाठी सिंगल इंजिन आणि दुहेरी इंजिन असलेले चार हेलिकॉप्टर बचावासाठी पाठवले जातील, याशिवाय, एमआय १७ साठी विनंती देखील पाठवण्यात आली आहे. आमची एनडीआरएफ्ची टीमही जोशीमठला पोहोचली आहे, तीही घटनास्थळाकडे जाईल, असे संदीप तिवारी यांनी सांगितले.

एसडीआरएफ्चे आयजी पोलिस रिधीम अग्रवाल यांनी सांगितले की, संघटनेची टीम जोशीमठला रवाना झाली आहे. परंतु लांबागडमध्ये रस्ता बंद असल्याने अडचणी येत आहेत आणि तो खुला करण्यासाठी लष्कराशी संपर्क साधण्यात आला आहे. सहस्त्रधारा हेलिपॅडवर आणखी एक टीम अलर्टवर ठेवण्यात आली आहे. घटनास्थळाची अचूक माहिती मिळाली आहे. हवामान अनुकूल होताच उंच ठिकाणी काम करण्यात तरबेज असलेल्या एसडीआरएफ्च्या टीमला

पान २ ▶